# उपसंहार

# उपसंहार

**प्रस्तावना :**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजीराजे यांच्या जन्माच्यावेळी अखिल भारतावर परकीय सत्ता राज्य करीत होत्या. दक्षिणेकडे आदिलशाही, कुतुबशाही निजामशाही आणि उत्तरेत मोगल सत्तेने भारत व्यापलेला होता. अशा या प्रतिकूल राजकीय काळी छत्रपती शिवाजी महाराजांनी बेंगलोराहून आल्यावर आपल्या वडिलांच्या जहागिरीच्या प्रदेशात स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. छत्रपती शिवाजी महाराज हे काळाची गरज ओळखून जुन्या सत्ता केंद्रांना नवी दिशा देणारे क्रांतीदर्शी समाज सुधारक होते. त्यांनी लक्षावधी लोकांच्या जीवनातील गतानुगतिकत्वाची भावना नष्ट करून त्यांना सत्ता साधनेची म्हणजेच नागरिकत्वाची प्रेरणा दिली. बहुजनसमाजाची स्वराज्याची भूक भागवण्यासाठी त्यांनी राज्यसंस्थापना केली.

स्वराज्य स्थापनेसाठी लोकांच्या मनात राष्ट्रीय भावना निर्माण करणे महत्त्वाचे होते. त्यासाठी महाराष्ट्रीय लोकांत सर्व लोकांचा अंतर्भाव शिवाजी महाराजांनी केला. यावनी सत्ता हाणून पाडण्यास्तव व प्रबळ सार्वभौम मोगल सत्तेस तोंड देण्यास केवळ लढवय्ये मराठे क्षत्रिय वीर, यवनसेवेपासून विन्मुख करणे पुरे नव्हते, तर देशातील सर्व लोकांच्या अंत:करणात राष्ट्रीय भावना जागृत करून सर्व लोकांचा पाठिंबा स्वराज्य स्थापनेस मिळवणे जरूर होते. अशी राष्ट्रीय भावना भारतातील सर्व लोकांच्या अंत:करणात जागृत करण्याचे प्रथम श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांना जाते. स्वराज्य म्हणजे शिवाजीचे किंवा भोसल्याचे किंव्हा मराठे क्षत्रियांचे राज्य नव्हे, तर महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व लोकांचे राज्य अशी शिवाजी महाराजांची कल्पना होती. हीच शिवाजी महाराजांची स्वराज्याची कल्पना उच्चतम राष्ट्रीय भावनेने भरलेली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यात सर्वांना समान संधी दिली. प्रत्येकाच्या अधिकारांची बूज राखली. ज्यांचे अधिकार परंपरेने चालत आलेले आहेत त्या अधिकारांचे राज्याने संरक्षण करावे. याबाबतचे अकारण झगडे केले तर महाराजाकडे तक्रार करण्याची सोय केली होती. स्वराज्यात राहणाऱ्या जनतेचे राजाने कल्याण केले पाहिजे

त्यासाठी त्यांनी अनेक कल्याणकारी कार्यक्रम आखले. अमात्यांच्या मते स्वराज्य म्हणजे 'नूतन सृष्टीच त्यांनी निर्माण केली'.

प्रस्तुत प्रबंधाची विभागणी पाच प्रकरणामध्ये केली असून हे संशोधन ग्रंथालय पद्धतीवर अधारित आहे. या शोधनिबंधासाठी कृष्णाजी आनंत सभासद यांची 'सभासद बखर', रामचंद्रपंत अमात्य यांचे 'आज्ञापत्र' आणि छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे यांचा प्राथमिक साधने म्हणून वापर केला आहे. तर दुय्यम साधने म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांवरील अनेक पुस्तकांचा आधार घेतला. या प्राथमिक व दुय्यम साधनांच्या सहाय्याने शिवाजीच्या 'स्वराज्य' या संकल्पनेचा तार्किक, सुसंगत आणि एकसंघ अभ्यास करण्याचा प्रयत्न या लघुशोध प्रबंधामध्ये केला आहे.

## सारांश :

या शोधनिबंधातील पहिल्या प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी शिवाजी महाराजांच्या चरित्राचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांच्या पूर्वीच्या राजकीय परिस्थितीचे विवेचन केले आहे.'हिंदवी स्वराज्य' संस्थापक राजा शिवछत्रपतींच्या जन्माच्या वेळी अखिल भारतावर परकीयांची सत्ता होती. या परकीय राजवटी स्थिरावण्यात एतद्देशीयांचा मोठा वाटा होता. इस्लामी आक्रमकांनी त्यापूर्वी शेकडो वर्षे आपल्या कारवाया सुरू केल्या होत्या. त्याचा परिणाम होऊन सोळाव्या शतकात हिंदूचे असे एकही स्वतंत्र राज्य अस्तित्वात राहिले नव्हते. शहाजी राजांनी स्वत:चे राज्य स्थापण्याचा उद्योग केला होता पण त्याला यश आले नव्हते.

अशा काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांतीचे बीज स्थानिक जनतेत रूजवून स्थानिक पुढाऱ्यांना हिंदवी स्वराज्याच्या व स्वातंत्र्याच्या कल्पनेने भारावून टाकले. रोहिडेश्वराच्या साक्षीने सर्वांनी शपथपूर्वक स्वराज्याच्या प्रतिज्ञेचा उच्चार करून क्रांतीच्या मार्गाने आपल्या वाटचालीस सुरूवात केली. आदिलशाहीतील, मोगलाईतील अनेक बलाढ्य सरदारांचा पराभव करून स्वराज्याच्या विस्तार केला.१६७४ मध्ये राज्याभिषेक करून हिंदवी राज्यसंस्थेला सांस्कृतिक, राजकीय आणि नैतिक अथवा सामाजिक श्रेष्ठ दर्जा व स्थैर्य प्राप्त करून देण्याचे काम त्यांनी केले. या राज्यास कान्होजी जेधेंनी 'महाराष्ट्र राज्य' म्हटले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना विषद केली आहे. महाराजांनी ताब्यात घेतलेल्या सगळ्या भूभागाला 'स्वराज्य' असे म्हटले आहे. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य. त्या राज्यावर इतर कोणत्याही सत्तेचा प्रभाव असणार नाही. असा स्वराज्याचा अर्थ घेतला आहे. महाराजांनी स्वराज्य संकल्पनेत सर्व व्यवस्था उत्तम ठेवण्यावर भर दिला आहे. अखंड सावधानपणा ही महाराजांची सततची आज्ञा होती. गनिम आपल्या ताप्यात येत असेल तर जेथे गनिमाचा आजार पोहचनार नाही अशा जागी रयतेला सुरक्षित ठेवले पाहिजे. या कामास एक घडीचाही दिरंग न करणे. सर्व प्रकारे रयतेचे रक्षण करून स्वरज्यामध्ये कोणत्याही लबाडीला, फसवेगिरीला महाराजांनी थारा दिला नाही.

प्रभावलीच्या सुभेदाराने त्याच्या कामात दिरंगाई केली तेव्हा त्यांनी त्याची कडक शब्दात कानउघाडणी केली. ते रयतेला पोटच्या पोराप्रमाणे जपत होते. सरकारी अधिकाऱ्याकडून अथवा तत्सम व्यक्तीकडून रयतेला कोणताही त्रास होता कामा नये यावर त्यांचा कटाक्ष होता. सरकारी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून भाजीपाले आणि वरकड जिन्नस हवे असतील तर त्याने बाजारात जावून रास्त भावाने विकत घ्यावे. कोणावरही जुलूम जबरदस्ती करण्याची परवानगी नव्हती. त्यांनी स्वराज्यामध्ये सर्वांना विकासाची समान संधी दिली. कोणताही भेदभाव केला नाही. त्यांनी स्वराज्यामध्ये आपल्या धर्माबद्दल आदर ठेवून इतर धर्माबाबतीत सहिष्णू धोरण ठेवून सर्वांना स्वराज्यामध्ये सामावून घेतले. महाराजांच्या स्वराज्यात या सर्व गोष्टींचा समावेश होतो.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी केलेली स्वराज्याची बांधणी विषद केली आहे. महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. वडिलार्जित जहागिरीमध्ये शौर्य, धैर्य, चातुर्थ व राजकीय मुत्सद्देगिरी यांचा अवलंब करून त्या छोट्याशा जहागिंरीचे स्वतंत्र राज्यात रूपांतर केले. या जहागिरीचे स्वतंत्र राज्यात रूपांतर करताना राज्यकारभार करण्यासाठी अष्टप्रधान शासनपद्धती निर्माण करून त्याच्या कामी कर्तबगार माणसे नेमली. शेतसारा बसवण्याच्या पूर्वी स्वराज्यातील जमीनीची मोजणी

करून बिघावणी पीक पाहणी आणि सारा आकारणी हे महसूल पद्धतीतील तीन टप्पे ठेवले. सारा आकारणीत लागवडीखालील जमीन तेवढीच विचारात घेतली.

महाराजांनी बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा पिकाचे करून तीन तक्षिमा रयतेस दिल्या जात व दोन तक्षिमा दिवाण्यांत घेतल्या जात असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणतीही मोहिम आखताना माणूस जास्त खराब होणार नाही याची ते दक्षता घेत. युद्धशास्त्रात त्यांनी जास्तीत-जास्त गनिमी पद्धतीचा वापर केला. युद्धामध्ये हेरांना भरपूर वेतन देऊन यश जास्तीत-जस्त संपादन केले.

स्वराज्याची बांधणी करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यविषयक धोरण ठरवताना साहेबकाम इमाने इतबारे करावे. 'येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरूस्त वर्तन करावे' असे त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले रयतेस तवाण करा ज्याला जोतास बैल नाहीत त्याला बैलासाठी पैसे द्या. पोटास दाणे नसतील तर त्याला खंडी दोन खंडी दाणे द्या. बैलाचे व दाण्याचे पैसे वाढी दिढीने वसूल न करता त्यांच्या ताकदीप्रमाणे ते वसूल करावे असे आदेश त्यांनी दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी ही न्यायाच्या आधारावर केली होती. स्नेहभावाच्या व्यक्तींच्या न्यायनिवाड्याच्या वेळीही शिवाजीराजे त्याचा कधीही पक्ष घेत नसत. स्वराज्यातील सर्व व्यक्ती ह्या कायद्यापुढे ते समान मानत. स्वराज्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला वाव नसे. छत्रपती शिवाजी म्हाराजांनी सर्व प्रकारच्या वेगवेगळ्या धर्मांना मदत केली. किल्ल्यांची व्यवस्था राखून स्वराज्याचा विस्तार केला.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या चौथ्या प्रकरणात महाराजांच्या परराष्ट्र धोरणाचे विवेचन केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उद्योग आपल्या वडिलांच्या जहागिरीत केला. त्यानंतर हळू-हळू आदिलशाही प्रांतातील किल्ले हस्तगत करत असताना ताकदवान मोगलांशी मात्र सदैव शत्रुत्वाचे संबंध ठेवले नाहीत. प्रथम त्यांनी आदिलशाहीशी लढा देऊन स्वराज्य स्थापन केले. ते जाणत होते की, एकाच वेळी अनेक शत्रू निर्माण करणे धोक्याचे आहे. कारण सर्व शत्रूंशी एकाच वेळी लढाई करणे स्वराज्याच्या दृष्टीने घातक

आहे. म्हणून सुरूवातीला मोगलांशी सलोख्याचे संबंध ठेवून स्वराज्य भक्कम करून घाटमाथा व देशावरचा प्रदेश हे शिवाजीचे राज्य आहे असे सिद्ध झाल्यावर आदिलशाहीशी करार केला.

आदिलशाहीशी करार होताच महाराजांनी मोगलांना शह दिला. या काळात त्यांनी शाहिस्तेखानाचा पराभव केला. सुरतेची लुट केली. जयसिंगाच्या प्रचंड सैन्यशक्तीपुढे टिकाव लागत नसल्याचे पाहून तात्पुरती माघार घेऊन जयसिंगाशी तह केला. जयसिंगाशी तह होताच आपल्या शेजारील शत्रूची ताकद कमी करण्याच्या कामी मोगलांची त्यांनी मदत घेऊन आदिलशाहाचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. दिल्लीतून निसटून सुखरूप मायदेशी परतल्यावर महाराजांनी १६६७ मध्ये मोगलांशी तह करून स्वराज्याची विघडलेली घडी पुन्हा बसविण्यावर लक्ष केंद्रित केले. महाराजांचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन दक्षिणेकडील आदिलशहाने व गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने त्यांना खंडणी देण्याचे कबुल करून उत्तरेकडील मोगलांच्या विरोधात महाराजांची मदत घेऊन लढणे त्यांना क्रमप्राप्त होऊन बसले.

महाराजांनी स्वराज्याची घडी मजबूत होताच १६६९ साली पुन्हा मोगलांशी संघर्षास सुरूवात केली. औरंगाबादची पेठ, बऱ्हाणपूरची पेठ लुटली. मोगलाचे दिलेरखान, बहादुरखान, इखलासखान असे मोठे-मोठे सरदार मारून गर्दीस मिळविले. मोगलांना दिलेले सत्तावीस गड माघारी घेतले. इ.स.१६७२ च्या अखेरीस मोगलांनी माघार घेऊन पडते घेतल्याबरोबर महाराजांनी अली आदिलशहाच्या मृत्यूनंतर पन्हाळा, सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी व परळी असे किल्ले घेऊन बहलोलखान, हुसेनखान मायना यांना बुडवून तुंगभद्रा पावेतो देश हस्तगत केला. या काळात महाराजांनी आदिलशाहीची पुष्कळ ताकद कमी केली. त्यामुळे आदिलशाहीतील कोणताही सरदार महाराजांशी संघर्ष करण्यास इच्छुक नसल्याचे पाहून ६ जून १६७४ रोजी त्यांनी राज्याभिषेक करून सार्वभौम राज्य म्हणून अधिमान्यता मिळवली.

महाराजांनी राज्याभिषेक करून घेतल्यानंतर खरे युद्ध मोगलांशी होणार होते त्यामुळे त्यांनी दक्षिणदिग्विजयाची तयारी केली. कारण स्वराज्याचे संकटकाळी रक्षण करण्यासाठी दक्षिणेस दुसरे राज्य असले पाहिजे असे त्यांनी परराष्ट्र धोरण आखले. त्यासाठी स्वराज्याच्या उच्चतर कार्यात व्यंकोजीराजे व मालोजी घोरपडे यांना सामावून घेण्याचा प्रयत्न

केला. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशी मैत्री जोडली. दक्षिणची पातशाही आंम्हा दक्षिणियांच्या हाती राहावी त्यासाठी तिघांनी आघाडी करून मोगलांना रोखने हा त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा आधार होता.

या शोधनिबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितलेल्या स्वराज्याचा अर्थ आणि संदेश याचे सविस्तर विवेचन केले आहे. सतराव्या आणि अठराव्या शतकात 'महाराष्ट्र राज्य' म्हणजे मराठ्यांची ज्या मराठी मुलखावर सत्ता होती त्याला स्वराज्य असे म्हणतात. स्वराज्य म्हणजे आपल्या जातीच्या लोकांचे गोमटे करणे. गनिमांच्या धाडीपासून आपल्या लोकांचे रक्षण करणे, शत्रूचा हल्ला होणार असेल प्रजेला सुरक्षीत स्थळी नेऊन पोहचवणे होय. प्रजेला सैनिकांच्या हालचालीपासून कसलीही तोशीस महाराजांनी लागू दिली नाही. स्वराज्यामध्ये न्यायदानाचे कार्य नि:पक्षपातीपणे झाले पाहिजे. स्वराज्याच्या कार्यात सर्व धर्मियांनी समान वागणूक दिली. हिंदवी स्वराज्य केवळ हिंदूचे नव्हे तर एतद्देशियांचे राज्य आहे असा महाराजांनी स्वराज्याचा अर्थ लावला आहे.

महाराजांनी परकीयांचा अंमल झुगारून देऊन आपल्या लोकांचे राज्य निर्माण केले. दक्षिणची पातशाही आंम्हा दक्षिणियांची हाती रहावी अशी त्यांची भावना होती. महाराजांनी कोणत्याही धर्माचा दुराभिमान बाळगला नाही. धर्माबाबतचे त्यांचे धोरण हे सहिष्णू होते. स्वराज्य म्हणजे धर्म स्वातंत्र्य होते. स्वराज्यामध्ये साहेबकाम इमाने इतवारे करावे. अधिकाऱ्यांनी रयतेच्या येक भाजीच्या देठासही मन दाखवू नये. स्वराज्यात राहणाऱ्या जनतेचे कल्याण झाले पाहिजे यावर महाराजांची निष्ठा होती. त्यासाठी त्यांनी उद्ध्वस्त झालेली गावे कौलनामे देऊन पुन्हा वसवली. दुष्काळात शेतकऱ्यांचा महसूल माफ केला. आरमारासाठी फळाची झाडे तोडू नये. कारण ती रयतेने लेकरांसाखरी जतन केलेली असतात. कोणावरही जुलूम जबरदस्ती करू नका. जातीचे पुरातन हक्क जे धर्मशास्त्राप्रमाणे चालत आले आहेत ते कायम राहतील. जो कोणी ब्राह्मण द्वेषबुद्धीने द्रव्यलोभास्तव शास्त्रविरहीत नवीन तंटे करून खलेल करील त्याचा सरकारकडून बंदोबस्त केला जाईल. असा छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा संदेश दिला.

## निष्कर्ष :

१. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा नवा अर्थ लावला. त्यात मराठ्यांना एकत्र मिळवून 'महाराष्ट्र राज्य' करण्याची कल्पना मांडली. ते राज्य उत्तम व चांगले असेल यावर भर दिला.

२. स्वराज्यामध्ये नेहमी कर्तव्यदक्षता, प्रजाहितदक्षता आणि शेतकरी व गरिबांचे कल्याण करणे हे गुण महत्त्वाचे मानले.

३. स्वराज्यामध्ये न्याय्य वागणूक व निपक्षपातीपणा असेल. कोणावरही अन्याय नाही.

४. वेदोक्ताच्या बाबत तंटे बखंडे नको.

५. मराठ्यांचे स्वतंत्र्य राज्य निर्माण करून राज्याभिषेकाद्वारे त्याला अधिमान्यता घेतली.

६. प्राचिन भारतीय राजकीय विचारांशी सातत्य ठेवून अनुभवाच्या आधारावर त्यात नवेपणा आणला. समर्थ रामदासांनी हिंदवी स्वराज्याला 'आनंदवनभवन' असे म्हटले आहे.